Exh.No. 10

नेवासा येथील मे. सिव्हील जज्ज साहेब (ज्यु.डि)

रे.मु. नं. यांचे कोर्टात.

५१५/२०२५ वादी

जावेद महेबुब शेख

प्रतिवादी

नसीम जावेद शेख

याकामी वादीतर्फे साक्षीदर क्रं. १ चे सरतपासणीचे प्रतिज्ञापत्र अस ते खालीलप्रमाणे.

याकामी मी वादी जावेद महेबुब शेख, वय ४२, धंदा मजुरी, रा. देवगाव, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर सत्य प्रतिज्ञेवर खरे सांगतो की,

मी प्रतिवादी विरुध्द मुस्लीम कायदया प्रमाणे झालेला विवाह (निकाह) विच्छेदन करण्यासाठी दावा केलेला आहे तो खालील प्रमाणे.

१. माझा व प्रतिवादीचा विवाह (निकाह) दि. १८/०४/२००५ रोजी मौजे भातकुडगाव, ता. नेवासा, जि.अहिल्यानगर येथे प्रतिवादीच्या आई-वडीलाचे घरी झालेला आहे. लग्नाचा सर्व खर्च मुलाकडील व मुलीकडील कपडे लत्ता, सोन्या-चांदीचे दाग-दागिने मी केलेला आहे. माझा व प्रतिवादीचा विवाह मुस्लिम धर्म शास्त्रा व रितीरिवाजा प्रमाणे झालेला आहे.

Order
Read & Recorded
PRANITA RITESH SUGAONKAR
Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2026.01.05 17:39:26 +0530
Jt.CJJD

२. लग्नानंतर प्रतिवादी माझ्याकडे मौजे देवगाव येथे नांदण्यास आली होती. त्यावेळी घरात माझी आई-इनताजबी, मी व प्रतिवादी असे एकत्र राहत होते. लग्नांनंतर प्रतिवादी माझ्याकडे काही दिवस बऱ्यापैकी नांदली. मी त्यावेळी मिळेल ते मोलमजूरीचे काम करत होतो व माझी व कुटुंबाची उपजिविका भागवत होतो. कारण मला वडीलोपार्जीत शेत जमीन मिळकत फार कमी असल्याने त्यात कुटुंबाची उपजिवीका भागत नव्हती.

३. दरम्यान प्रतिवादीच्या वागण्यात काहीप्रमाणात बदल होत होते. त्यावेळी मला असे वाटले होते की, विवाह आत्ताच झाला आहे. प्रतिवादीस

सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर
नेवासा

सुरूवातीला करमत नसेल. परंतू प्रतिवादी नेहमी माझ्याशी व माझ्या आईशी नेहमी या ना त्या कारणावरून भांडण करीत असे व घरातून बाहेर जाण्याचा प्रयत्न करीत असे. प्रत्येकवेळी मी प्रतिवादीची समजूत घालून घरी आणत होतो. दरम्यान प्रतिवादीस माझ्यापासून दिवस जावून मुलगा रेहान हा दि. ११/०८/२००७ रोजी झाला. त्यावेळी मला असे वाटले की, आतातरी प्रतिवादीच्या वागण्यात बदल होईल. प्रतिवादी डिलेवरी नंतर नांदण्यास आणल्यावर तिच्या वागण्यात काहीएक बदल झाला नाही. उलट प्रतिवादी माझ्याशी व माझ्या आईशी जास्त भांडणे करीत असे. याची मी प्रतिवादीच्या आई-वडीलांना समज दिली होती की, प्रतिवादी हि माझे सोबत व घरात कसे वागत आहे.

४. असे असताना प्रतिवादीचे वडील गुलाब पठाण प्रतिवादी व नातवास भेटण्याकरीता माझे घरी मौजे देवगाव येथे आले असता त्यांना प्रतिवादीचे विवाहबाह्य संबंध गावात असल्याबाबत कळाले. त्यावेळी त्यांनी प्रतिवादीस मारहाण करण्यास सुरूवात केली म्हणून मी प्रतिवादीस त्यांचे तावडीतुन सोडून घेवून प्रतिवादी व त्यांचे वडीलाची समजूत घातली व प्रतिवादीच्या वडीलांना सांगीतले माझी पत्नी आहे तुम्ही तिला केवळ समजून सांगा. मी तीला समजून सांगतो माझा प्रपंच उधवस्त होईल मुलाचे हाल होतील असे सांगून त्यांना माघारी पाठून दिले. त्यावेळी प्रतिवादीने परत असे करणार नाही असे सांगितल्याने मी कुठलीही कारवाही केली नाही.

५. असे असताना प्रतिवादीस माझ्यापासून पुन्हा दिवस जावून मुलगी आलिया ही सन २०११ साली झाली. त्यानंतर देखील प्रतिवादी घरात किरकोळ कारणावरून वाद विवाद करून घराबाहेर निघून जात असे. त्यानंतर प्रतिवादीच्या विवाहबाह्य संबंधास माझ्या आईची अडचन होत असल्याने प्रतिवादीने माझ्या आईस घरातून हकलून दिले व माहेरी निघून गेली होती. त्यावेळी माझी आई ही माझा मोठा भाऊ कडूभाई यांचेकडे राहू लागली. त्यानंतर मी प्रतिवादीची समजूत घालून नांदण्यास आणले. त्यावेळी

प्रतिवादीने घरापासून दूर घेवून राहत असेलतरच नांदण्यास येते असे सांगितल्याने मी गावठाण हद्दीत असलेल्या जागेत घर बनवून घेतले. त्यावेळी शासकीय योजणेचा लाभ मिळून घरकूल देखील बांधले. घरकुलाकरीता पती-पत्नी यांचे नाव उताऱ्यावर घेणे आवश्यक असल्याने मी प्रतिवादीचे नाव देखील ग्रामपंचायत उताऱ्यावर सामाईकात लावले होते व आहे.

६. असे असताना मी ३ चाकी रिक्षा चालवत होतो. मी बाहेर गेल्यावर प्रतिवादी विवाह बाह्य असलेले संबंध करीत असे. हे कृत्य मला समजल्याने मी प्रतिवादीची समजूत घालण्याचे प्रयत्न केले तरी देखील प्रतिवादीच्या वागण्यात बदल झाला नाही. तेव्हा प्रतिवादीने मला स्पष्ट सांगितले की, मी माझे असलेले संबंध बंद करणार नाही तुम्हाला काय करावयाचे करून घ्या. तुम्ही मला त्रास दिला तर मी माझे जिवाचे काही बरे वाईट करील व त्यात तुमचे नाव गुंतवीन नाहीतर वेळ प्रसंगी तुम्हालाही मारून टाकीन. त्यावेळी मी प्रतिवादीस समजावून सांगितले की, घरातील भांडण बाहेर जायला नको मुलांकडे पाहून वादी शांत बसत असे.

७. पुढे मी बाहेर गेल्यावर प्रतिवादी मोबाईलवरून बाबा शेख ह्या ईसमाशी फोनवरून, ईंस्टाग्राम वरून, व्हाट्स ॲप वरून चाटींग करून व्हिडीओ कॉल, मॅसेज करून बोलत असल्याचे मला समजले. त्यावरून मी बारकाईने लक्ष दिल्याने मला असे दिसून आले की प्रतिवादीचे व बाबा शेख रा.बालम टाकळी, ता. शेवगाव, जि.अहिल्यानगर याच्याशी विवाह बाह्य संबंध आहे. त्यामुळे त्याचे पुरावे म्हणून मी प्रतिवादीची व बाबा शेख यांची ईंस्टाग्राम या सोशल मिडीयाची झालेली चॅटींग सेव्ह केली व प्रतिवादीच्या आई वडीलांना दाखवून बैठक करून प्रतिवादीस समजूत घालण्यास बोलावले असता बैठक करण्याकरीता प्रतिवादीचे वडील गुलाब पठाण, भाऊ भैय्या पठाण व माझा भाऊ हबीब, सलीम अशांनी बैठक करून प्रतिवादीस समजावले होते. तरी देखील प्रतिवादीच्या वागण्यात बदल झाला नाही उलट प्रतिवादीने तिच्या कृत्यात वाढ करून मला त्रास देत असे व

माझी बदनामी करत माझेच विवाह बाह्य संबंध आहेत असे सांगून त्रास देत असे व म्हणत असे तुला जर जिवंत राहावयाचे असेल तर घर सोडून जा नाहीतर तुला विष जेवणात घालून मारून टाकीन किंवा मी माझे जिवाला त्रास करून तुला खोट्या गुन्ह्यात गुंतविन.

८. असे असताना प्रतिवादीने एक दोन वेळा मला जिवे मारण्याचा प्रयत्न देखील केला होता. तसेच प्रतिवादी स्वतः हाताने ब्लेड मारून हाताचे शिरा कापून मला जिवाचे बरे वाईट करील असे धमकावत होती. त्यावेळी मी प्रतिवादीवर उपचार करून घरातील व नातेवाईकांना बोलावून प्रतिवादीस समजून सांगण्यास बोलावले असता प्रतिवादीने खोटे नाटे सांगून मला प्रतिवादीचे वडील गुलाब पठाण, भाऊ भैय्या व माझा भाऊ सलीम व चुलत भाऊ यांना सांगून मला मारण्यास सांगितले व म्हणाले की याला जिवे मारून टाका. त्यावेळी मी कसेबसे लोकांच्या तावडीतून पळून जावून वरील लोकांच्या विरूध्द नेवासा पोलिस स्टेशनचे कुकाणा पोलिस चौकीत तक्रार केली व उपचार केले तेव्हा पासून मी भेंडा गावात खोली भाडोत्री घेवून राहत आहे.

९. प्रतिवादीपासून व त्यांच्या नातेवाईक तसेच प्रेमी पासून माझे जिवीताला धोका आहे. त्यामुळे मी बाहेर राहत असून प्रतिवादी मला घरी देखील येवू देत नाही किंवा मुलांना भेटू देत नाही. मी मुलांना घरा बाहेर भेटून त्यांच्याप्रती असेलेले प्रेम व्यक्त करतो त्याची माहीती प्रतिवादीस झालीतर प्रतिवादी मुलांना देखील मारहाण करते. प्रतिवादीच्या अश्या वागण्याने माझ्यावर परीनाम होवून व माझे खाण्यापिण्याचे हाल होत असल्याने मी शरीराने कमकुवत होत आहे. तसेच मुलांच्या भविष्यावर देखील परीनाम होत आहे. त्यामुळे माझा प्रतिवादीवर भरवसा राहीलेला नाही. मला पुर्ण खात्री झाली आहे की प्रतिवादी माझ्यासोबत विवाहीत जिवण जगणार नाही. प्रतिवादीस वारंवार समजावून देखील ती तिच्या वागण्यात बदल करीत नाही.

१०. मी वयाने तरुण असुन मला कौटुंबिक सूखाची नितांत गरज आहे. तसेच मी माझ्या कुटूंबातुन वेगळे राहत असल्याने व गावातून बाहेर गावी खोली घेवून

सहा.
सह दिवाणी

राहत असल्याने माझ्या खाण्यापिण्याची हाल अपेष्टा होत आहे. त्यामुळे मी शारीरीक व मानसिक दृष्टया कुमकुवत झालो आहे व नैराश्याचे जीवन जगत आहेत.

११. असे असताना माझे प्रतिवादी यांचे नातेवाईक यांच्या मध्ये आपसात बैठक बसली व भविष्यामध्ये माझा प्रतिवादीचा संसार सुखाचा हाणार नाही याची खात्री मला झालेली आहे. त्यामुळे मला लग्न बंधनातुन मुक्त होणे "खुला" होणे जरुरीचे आहे. मी तरुण असून मला संसार सुखाची अत्यंत आवश्यकता आहे. तसेच माझ्या खाण्या पिण्याचे हाल होत आहे. प्रतिवादी ही माझ्याकडे भविष्यात कधीही नांदण्या तयार नाही. याची खात्री मला झालेली आहे. कारण मी प्रतिवादीस वेळोवेळी मध्यस्था मार्फत व नातेवाईका मार्फत समजावून सांगण्याचा प्रयत्न केला तरी देखील प्रतिवादी माझ्याकडे नांदण्यास आली नाही. म्हणून मी दि.३०/०४/२०२५ रोजी प्रतिवादी हिस नांदण्याकामी व तिचे गैरकृत्य परत करणार नाही याकरीता रजीस्टर पोस्टाने नोटीस पाठवली होती. सदरची नोटीस प्रतिवादीस मिळून देखील ती मला सोबत घेवून नांदली नाही अथवा तिने मला कुठलेही नोटीस उत्तर पाठविले नाही. उलट फोन वरून मला स्पष्ट सांगितले की, मी तुला घरात येवू देणार नाही. तु मला पुन्हा नोटीस पाठवू नको, तु माझ्याकडून फारकत घे असे सांगितले. एकवार संधी म्हणून मी पुन्हा अंतिम नोटीस म्हणून माहीतीगार वकीला मार्फत प्रतिवादीला दि. २७/०५/२०२५ रोजी पुन्हा अंतिम नोटीस पाठवली. सदर नोटीस प्रतिवादीला मिळून देखील तिने मला घरात येवू दिले नाही उलट पुन्हा फोन वरून धमकावून आता तुझी जिरवते असे सांगून खोट्या मजकूराचे उत्तर देवून मला एका घरात नांदण्याबाबत काहिएक सांगितले नाही म्हणुन मला सदरचा दावा मे. कोर्टा समोर माझे दिनांक १८/०४/२००५ रोजी प्रतिवादीसोबत झालेले लग्न (निकाह)

संबंध संपुष्टात आणण्यासाठी सदरचा दावा प्रतिवादी विरुध्द दाखल करणे भाग पडले आहे. मी माझ्या दोन्हीही मुलांना संभाळण्यास तयार आहे. त्यांची जबाबदारी माझ्यावर देण्यात यावी.

१२. सदर दाव्यात प्रतिवादी हीस दाव्याची बजावणी झालेली असुन ती या मे. कोर्टात तिचे माहीतगार वकीलामार्फत हजर झालेली आहे तिस मे. कोर्टाने वेळोवेळी संधी देऊनही तिने तिचे म्हणणे/ कैफियत दाखल केलेली नाही त्यामुळे मे न्यायालयाने दि. १३/१०/२०२५ रोजी तिचेविरुध्द विनाम्हणणे आदेश पारित केलेला आहे.

१३. **सबब माझी मे. साहेबांना विनंती की,**

अ) वरील हकीगतीस अनुसरून माझा व प्रतिवादीचा विवाह (निकाह) दि.१८/०४/२००५ रोजी मौजे भातकुडगाव, ता. शेवगाव, जि.अहिल्यानगर येथे झालेला आहे. माझा व प्रतिवादीचा दि. १८/०४/२००५ रोजीचा लग्नाचा झालेला करारनामा रद्द करण्यात यावा. त्याप्रमाणे लग्नसबंधातून मला "खुला" करण्यात यावे व त्याप्रमाणे घटस्फोट खुलाची डिक्री मंजूर करून त्या प्रमाणे जाहीर ठराव होवुन मिळावा ही नम्र विनंती.

ब) मी माझ्या दोन्हीही मुलांना संभाळण्यास तयार आहे. त्यांची जबाबदारी माझ्यावर देण्यात यावी.

क) या दाव्याचा खर्च मला प्रतिवादी कडून देववावा.

ड) इतर योग्य ते न्यायाचे हूकूम माझे लाभात व्हावेत.

इ) जरूर वाटल्यास मला दाव्यात दुरुस्त करण्याची परवानगी असावी.

येणेप्रमाणे सरतपासणीचे ॲफिडेव्हिट दिले असे.

नेवासा

जावेद मेहबुब शेख

दिनांक ०५/०१/२०२६

ॲफि.करणार

ओळख

(Adv. MH Jadhav)

या कामी मी जावेद महेबुब शेख वय ४१, धंदा मजुरी रा. देवगाव, ता. नेवासा, जि.अहिल्यानगर, ह.मु. भेंडा, ता. नेवासा, जि.अहिल्यानगर सत्य प्रतिज्ञेवर खरे सांगतो की, वरील ॲफिडेव्हिट मधील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर असून त्याचे सत्यतेसाठी आज रोजी मी माझी सही केली आहे.

जावेद महेबुब शेख

नेवासा

दिनांक ०५/०१/२०२६ — ॲफि.करणार

Aadhar ID 4143 15313061

Solemnly affirmed before
by- Javed Mahebub Shaikh R/o Devgaon Tal Nevasa
who is identified before me
by- Adv M.H. Jadhav
whom I personally know

5/1/26

Asstt Superintendent